# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## डॉक्टरांसोबत केलेलं गैरवर्तन खपवून घेणार नाही

**पणजी (गोवा)/मुंबई :** शिवसेना प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालघरमधील एका खासगी रुग्णालयात डॉक्टरांसोबत होणाऱ्या गैरवर्तनाची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात, त्यांनी शिवसेना पालघर शहर प्रमुख राहुल घरत यांना पक्षातून निलंबित करण्याची घोषणा केली आहे. गोव्यात झालेल्या पश्चिम विभागीय परिषदेच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ही माहिती दिली.

## सरकारविरोधात राज्यातील कंत्राटदारांचे 32 जिल्ह्यांत आंदोलन

**मुंबई :** शासकीय कंत्राटदारांनी प्रलंबित बिलांसह विविध मागण्यांसाठी सोमवारी राज्यभरात आंदोलनाची हाक दिली. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने राज्यातील तब्बल ३२ जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात आली आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्यातील कंत्राटदारांच्या दुर्दैवी आत्महत्येस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून चौकशी समिती नेमणे आणि मृत कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणे, याचा समावेश आहे.

## थोडक्यात वार्ता

### ऑफलाईन, अनधिकृत प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई

**मुंबई :** राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारेच करणे बंधनकारक असून, मंजूर क्षमतेपेक्षा जास्त किंवा ऑफलाईन पद्धतीने अनधिकृत प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार २०२५-२६ पासून राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत. या प्रक्रियेचे काटेकोर पालन करण्याबाबत शिक्षण उपसंचालकांना निर्देश देण्यात आले आहेत. काही कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मंजूर क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने प्रवेश दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा विद्यार्थ्यांना पुढे इयत्ता १२ वीच्या राज्य मंडळाच्या अर्ज प्रक्रियेदरम्यान अडचणी निर्माण होतात. तसेच प्रवेश नियमित न झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असते. यामुळे कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाने ऑफलाईन पद्धतीने प्रवेश देऊ नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या सूचनांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालय तसेच मुख्याध्यापकांविरुद्ध महाराष्ट्र कर्मचारी खासगी शाळा (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७७ व नियमावली, १९८१ मधील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी दिला आहे.

### शालेय साहित्य वाटपावर मोठं स्पष्टीकरण; वह्यांबाबतचा दावा फोल

**मुंबई :** मुंबई महापालिका शाळांमधील मुलांना शालेय वस्तूंचे वाटप हे आयत्या वेळी जेम पोर्टलवरून करण्याचा निर्णय घेत याची निविदा प्रक्रिया महापालिकेने पूर्ण केली. त्यामुळे ही निविदा प्रक्रिया आणि शाळांमध्ये होणारे वाटप याला विलंब होईल अशाप्रकारची जी शंका उपस्थित केली जात होती, तसे न घडता सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मुलांच्या हाती गणवेशासह सर्व साहित्य पडले. त्यामुळे केवळ वह्यातील दोन चार पाने कमी असल्याचा कांगावा करत विरोधी पक्षाने या साहित्य वाटपाला विलंब झाल्याचा आरोप केला. पणया वह्यांची पानेच सभागृहात मोजून दाखवत विरोधकांचा आरोपातील हवाच काढून टाकण्यात आली. मुंबई महापालिकेच्या विरोध पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी निवेदनाद्वारे शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात झालेला विलंब आणि जेम पोर्टल खरेदीतील गोंधळाबाबत आरोप केला. शालेय वस्तूंचे वाटप मुलांना अद्यापही झालेले नसून शालेय वाटपातील या गंभीर विलंबाला जबाबदार असलेल्या शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची मागणी केली. तसेच जेम पोर्टलद्वारे झालेल्या खरेदीचे आणि वस्तूंच्या निकृष्ट दर्जाचे तात्काळ थर्ड पार्टी ऑडीट करून त्यांचा अहवाल सादर करण्याची मागणी केली. यावर भाजपच्या स्वप्ना म्हात्रे यांनी जेम पोर्टलचा वापर का करण्यात आला आणि यामुळे महापालिकेचे ४५ कोटी रुपये कसे वाचले हे सांगितले. काँग्रेसचे अश्रफ आझमी यांनी मुलांना छत्री मिळालेली नसून पाण्याची बॉटल्स गळत असल्याचा आरोप केला तसेच मुलांच्या मापाचे बूट नसल्याचा आरोप केला. यावर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी या सभागृहात वाटप करण्यात आलेली सर्व साहित्य ठेवण्यात यावी त्यातील निकृष्ट दर्जाची कोणती आहे हे त्यांनी दाखवावे. तसेच आतापर्यंत किती साहित्याचे वाटप झाले याची माहिती देत हा फेक नॅरेटिव्ह आहे की फेल नॅरेटिव्ह आहे हे दाखवून दिले जावे अशी सूचना केली. तर शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी या नव्या पद्धतीच्या अभावामुळे कंत्राटांमध्ये गैरप्रकार होत होते, हे सर्वांनाच माहिती आहे.

### "शाल जोडे"




# पूर्णा रेल्वे स्थानकावर सुविधां उपलब्ध नसल्याने प्रवाशांचे हाल

### दिशा दर्शक फलक नसल्याने प्रवासी परेशान

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** लोहमार्गाचे मराठवाड्यातील संपूर्ण भारताच्या लोहमार्ग शि जोडणारा दुवा म्हणजे पूर्णा रेल्वे स्थानक त्याची ओळख मराठवाड्यातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक असल्याने हजारो प्रवाशाचीये ये जा होत असते या रेल्वे स्थानकावर चार प्लॅटफॉर्म असल्यामुळे ठळक मोठ्या अक्षरात प्लॅटफॉर्म नंबर टाकने गरजेचे असते तसेच रोशनच्या सोयीसाठी पाधचारी पुल( दादरा ) असून त्यावर नामनिर्देशक दिशादर्शक फलक नसल्याने प्रवाशांचे हेळसांड होत आहे मालगाड्याची एजा होत असल्याने ऐनवेळी अलाउन्स करून प्लॅटफॉर्म बदलल्याचे ध्वनिक्षेपत सूचना केल्या जातात त्यावेळेस प्रवाशाची तारांबळ उडते त्यामध्ये वृद्ध प्रवाशांचे तर बेहाल होतात पाद चारी पुल प्लॅटफॉर्मच्या कडेल असल्यामुळे व त्यामध्ये रेल्वेचे कामाचे साठी केलेले खड्डे व चालू असलेले काम यामुळे प्रवासी मीठा कुटी स आलेले असून विशेष करून पर गावचे प्रवासी यांना स्टेशनची माहिती नसल्यामुळे व योग्य प्लॅटफॉर्म न मिळाल्यामुळे धावपळ करावी लागते रेल्वे स्टेशनवर



प्लॅटफॉर्म क्रमांक चा नामनिर्देशित बोर्ड लावणे गरजेचे आहे पूर्ण शहराचा विस्तार दोन्ही बाजूंनी झालेला असून प्रवाशांना दोन्हीकडे जायचं असेल तर पाचारी पुलाच्या मार्गे नवीन निर्माण करताना दोन्ही बाजूने बाहेर जाण्यासाठी पायऱ्याच्या मार्गे काढून द्यावा आता केवळ एका बाजूनेच उतरण्याची सुविधा केल्यामुळे प्रवाशांना पूर्ण प्लॅटफॉर्मला चक्कर मारून व अधिकचे अंतर पार करून रेल्वे स्थानका बाहेर जावे लागते प्रवाशांना एजा करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी प्लॅटफॉर्मवर पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी सर्व प्लॅटफॉर्म स्वच्छ करण्यात यावेत प्लॅटफॉर्मवर स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी याकरिता रेल्वे प्रशासनाने दोन्ही बाजूंनी प्रवाशांना उतरण्याची सुविधा प्रवाशाकडून होत आहे तसेच दिव्यांग वयोवृद्ध प्रवासी महिला लहान मुले तसेच मोठ्या प्रमाणात सामान घेऊन प्रवासी करणाऱ्या नागरिकांना पादचारी फुल चढून जाणे अत्यंत त्रासदायक ठरते म्हणून याकरिता प्रवाशांच्या सुविधेसाठी लिफ्ट एक्सलेटर ची सुविधा उपलब्ध करून देणे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे स्थानकावर सुलभ वापर व्हावा रेल्वे स्थानकावर बसवण्यात आलेल्या फरशा हे ग्रॅनाईट असल्यामुळे त्यावरून चालताना गडबडीने घसरून पडत आहेत एका दिवशी मोठा अनर्थ घडल्याशिवाय राहणार नाही म्हणून अशा धोकादायक फरशा टाकण्याऐवजी ग्रीप असलेल्या फरश्या बसविण्यात याव्या स्वच्छता ठेवण्यात यावी रेल्वे स्थानकावर दिव्यांग व वृद्ध प्रवासासाठी सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी तिकीट काढण्यासाठी दोन्ही बाजूने सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी या मागणीसाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले या निवेदना वर पूर्ण शहराचे युवा सेनेचे शहराध्यक्ष मोहन गुंजकर मुन्ना राठोड राहुल बरदाळे अमजद खान पठाण बाळू भाऊ खंदारे वैजनाथ भालके सुरेंद्र धुळे, रामा खंदारे मोहम्मद जाकीर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत .

# आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी 'झिरो टॉलरन्स' धोरण

### आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सार्वजनिक आरोग्य विभागाचा सर्वंकष आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम, कार्यक्षम आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कामकाजाचा सर्वंकष आढावा शनिवारी पुण्यात घेण्यात आला. आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली एनसीसीआरसी येथे ही बैठक झाली. यावेळी आरोग्य सेवांमधील त्रुटींवर तातडीने कार्यवाही करून 'झिरो टॉलरन्स' धोरण प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना काटकर यांनी दिल्या.

बैठकीस संचालक (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे यांच्यासह आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख, पुणे येथील ब्युरो प्रमुख तसेच जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत गरोदर मातांचे प्रभावी ट्रॅकिंग, माता व बालमृत्यू रोखण्यासाठीच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी, आपत्कालीन उपचारांसाठी २४ तास टेलिमेडिसिन सुविधा उभारणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांना अधिक बळकटी देण्यावर विशेष भर देण्यात आला. नागरिकांना वेळेत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ, साधनसामग्री आणि आरोग्य सुविधांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना काटकर यांनी दिल्या.

माध्यमांशी समन्वय वाढविण्यावर भर

बैठकीच्या दुसऱ्या सत्रात माध्यम व समाजमाध्यमांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आरोग्य विभागाच्या योजना, उपक्रम आणि नागरिकांसाठी उपलब्ध सेवांची अधिकृत व वस्तुनिष्ठ माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी माध्यमांशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील मुद्रित, डिजिटल, वृत्तवाहिन्या आणि समाजमाध्यमांचे नियमित निरीक्षण करावे. आरोग्य विभागाशी संबंधित बातम्या, व्हिडिओ, पोस्ट, नागरिकांच्या प्रतिक्रिया व संदेश यांची तातडीने नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे काटकर यांनी सांगितले. चुकीची, दिशाभूल करणारी किंवा अपूर्ण माहिती प्रसारित झाल्यास संबंधित कार्यालयाकडून वस्तुस्थिती जाणून घेऊन तातडीने तथ्यात्मक खुलासा करावा. माध्यमांतील महत्त्वाच्या वृत्तांना तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी प्रभावी 'मीडिया रिस्पॉन्स मेकॅनिझम' विकसित करण्यावरही भर देण्यात आला.

**जिल्हानिहाय समाजमाध्यम अहवाल बंधनकारक :** प्रत्येक जिल्ह्यातील समाजमाध्यमांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्यासाठी जिल्हानिहाय अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. या अहवालात समाजमाध्यमांवरील पोस्ट व सामग्रीची संख्या, आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा, महत्त्वाच्या उपक्रमांची प्रसिद्धी, नागरिकांचा प्रतिसाद, तक्रारी, महत्त्वाच्या बातम्या तसेच चुकीच्या माहितीवरील कार्यवाहीचा समावेश असावा.

# आरोग्य विभागात आता कामगिरीला मिळणार प्राधान्य

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचा निर्णय

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सार्वजनिक आरोग्य विभागात कामगिरीआधारित प्रशासकीय कार्यसंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे दरवर्षी वस्तुनिष्ठ पद्धतीने गुणांकन करण्यात येणार आहे. मागील तीन वर्षांतील कामगिरीच्या आधारे अधिकाऱ्यांची श्रेणी निश्चित केली जाणार असून, त्याचा उपयोग जबाबदाऱ्यांचे वाटप, पुढील तीन वर्षांचे कार्यनियोजन आणि भविष्यातील नियुक्त्यांच्या वेळी केला जाणार आहे.



या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागात केवळ सेवाज्येष्ठतेला प्राधान्य न देता अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष कामगिरी, नेतृत्वक्षमता, रुग्णसेवा, आर्थिक शिस्त, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांना महत्त्व मिळणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्यास मदत होणार आहे.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या क्षमतेनुसार त्यांना पुढील संधी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था निर्माण होणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचे मनोबल वाढण्यासोबतच प्रशासकीय कामकाजात सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

### मंगळवारी परभणीतील भव्य रॅलीचे आयोजन

# अंतरवाली सराटीकडे हजारो मराठा बांधव प्रस्थान करणार

हिंदू प्रकाश वार्ता अशोक पवार

**परभणी':-** गेली दहा दिवसापासून सुरू असलेल्या आंदोलनात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मरण उपोषणाची हाक दिल्याने व हे उपोषण सुरू असल्याने त्यांच्या समर्थ नॉर्थ व लढ्याला पाठिंबा देण्यासाठीव आपला सहभाग नोंदवण्यासाठी परभणी जिल्ह्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक 8 सप्टेंबर मंगळवार रोजी भव्य चार चाकी व दुचाकी वाहनाच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक 8 सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी ठीक नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निघणार असून सर्व मराठा बांधव नरसिंह पोखरणी मार्गे पाथरी हायवे वरून पुढे जातील व आष्टी फाटा येथे त्यांना अल्पहार व चहा पाणी यांचे व्यवस्था करण्यात आली असून सर्व गाड्यांचा ताफा अंतरवाली सराटीकडे संघर्ष होता म्हणून जरांगे पाटील यांच्या उपोषण स्थळाकडे प्रस्थान करणार आहेत या सकल मराठा समाजाच्या मराठा आरक्षणाला अधिक संघर्षाला त्यागाला बळ देण्यासाठी या आंदोलनात आपला खारीचा वाटा असावा या भावनेने सकल मराठा बांधवांनी यार अलीत सहभागी व्हावे असे आव्हान सकल मराठा समाज परभणी जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे. या रॅलीत सहभागी होणाऱ्यासकल मराठा बांधवांनी आपली गैरसोय होऊ नये म्हणून स्वतःचा जेवणाचा डब्बा सोबत ठेवावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे

# मराठवाड्यात पाऊस कमी झाल्यामुळे भीषण पाणीटंचाईचे संकट

### जायकवाडी वगळता सर्व धरणांतील पाणी पिण्यासाठी राखीव - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात यंदा सरासरीच्या तुलनेत सुमारे 30 टक्के पावसाची तूट निर्माण झाल्यामुळे प्रशासनाने अत्यंत कठोर आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्प वगळता इतर सर्व धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आला असून, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी याविषयीची सविस्तर माहिती दिली आहे. पावसाळ्याचे दिवस असूनही अनेक भागांत टँकरची गरज भासू लागल्याने प्रशासनाने आतापासूनच कडक पावले उचलली आहेत.

यंदाच्या पावसाळ्यात मराठवाड्यात पावसाचे प्रमाण अत्यंत अपुरे आणि असमाधानकारक राहिले आहे. विभागामध्ये परभणी जिल्ह्यात तब्बल 43 टक्के आणि लातूर जिल्ह्यात 47 टक्के इतकी सर्वाधिक पावसाची तूट नोंदवली गेली आहे. पावसाअभावी जायकवाडी प्रकल्प वगळता मराठवाड्यातील अनेक लहान-मोठे प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. या गंभीर परिस्थितीमुळे रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनाचे नियोजन करताना मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्याबाबत सध्यातरी निर्बंध येणार आहेत. नागरिकांची पिण्याची गरज भागवणे ही प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

धरणांमधून होणारा बेकायदेशीर आणि अनधिकृत पाण्याचा उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. धरणांमधून बेकायदेशीरपणे पाणी उपसा करणारे सर्व विद्युत पंप तातडीने जप्त करण्याचे अत्यंत कडक आदेश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत. पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी आणि त्यावर प्रभावी वचक ठेवण्यासाठी विशेष गस्ती पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत मराठवाड्यातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता, प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. सध्या संपूर्ण विभागात जवळपास शंभर टँकरद्वारे पिण्याचा पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच पाणीटंचाईग्रस्त भागांमधील नागरिकांची सोय करण्यासाठी सुमारे 450 गावांमध्ये खाजगी व सार्वजनिक विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. आगामी उन्हाळ्याची दाहकता आणि पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई रोखण्यासाठी नागरिकांनीही पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा. असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जलजीवन मिशनच्या अपूर्ण कामांची चौकशी करा; दिशा समितीच्या बैठकीत खा. संदिपान भुमरे यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

प्रत्येक घरी पाणीपुरवठा करणाऱ्या 'जलजीवन मिशन' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत अनेक गावांमध्ये अद्यापही नळाद्वारे पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याची गंभीर दखल घेत अशा सर्व अपूर्ण कामांची कसून चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश खासदार संदिपान भुमरे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात खा. संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहअध्यक्ष खा. डॉ. कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत केंद्र शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष




अविनाश गलांडे, विधान परिषद सदस्य सुहास शिरसाट, आमदार अब्दुल सत्तार, आमदार रमेश बोरनारे, आमदार प्रशांत बंब, आमदार संजना जाधव, आमदार विलास भुमरे तसेच जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी मागील बैठकीच्या अनुपालन अहवालावर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्गाच्या कामांबाबत चर्चा करण्यात आली. महामार्ग या विषयावरील प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी लवकरच एक स्वतंत्र बैठक घेतली जाईल, असे खा. भुमरे यांनी जाहीर केले. यासोबतच प्रधानमंत्री पीक विमा योजनेची जिल्ह्यात योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याच्या निकषांमध्ये आणि नियमांमध्ये बदल होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यासंदर्भात केंद्रीय कृषी मंत्र्यांसोबत लवकरच विशेष बैठक आयोजित केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), बायो मायनिंग, बायो मेडिकल वेस्ट आणि जलजीवन मिशन यांसारख्या प्रमुख विषयांवर सखोल चर्चा झाली. जलजीवन मिशनच्या कामांबाबत गावागावांमधून तक्रारी येत असून अनेक ठिकाणी नळांना पाणीच येत नसल्याचे निदर्शनास आले. या अपूर्ण आणि रखडलेल्या कामांची चौकशी करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले. तसेच, शेतकरी वर्गाला पिकांना नियमित पाणी देता यावे यासाठी महावितरणने कोणत्याही प्रकारकाचे भारनियमन न करता विनाखंड वीज पुरवठा करावा, असे सक्त निर्देशही बैठकीत देण्यात आले. दोन टप्प्यांत पार पडणाऱ्या या दिशा समितीच्या बैठकीतील उर्वरित विषयांवर आगामी १८ रोजी पुन्हा बैठक घेण्यात येईल, असे खा. भुमरे यांनी जाहीर केले.

# ग्रामीण भागातील LPG बुकिंगचा 45 दिवसांचा नियम रद्द

### आता 25 दिवसांनी सिलेंडर बुक करता येणार

मुंबई : जागतिक बाजारातील घडामोडी आणि पुरवठा साखळीतील बदलांचा परिणाम देशातील गॅस वितरण आणि दरांवर होत असतो. ग्राहकांच्या गरजा तसेच बाजारातील परिस्थितीचा विचार करत सरकारने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आता ग्रामीण भागातील ग्राहकांनाही अवघ्या २५ दिवसांच्या अंतराने घरगुती LPG सिलेंडरचे रिफिल बुक करता येणार आहे. केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी लागू असलेली ४५ दिवसांची बुकिंगची अट हटवली आहे. त्यामुळे आता ग्रामीण आणि शहरी भागातील सिलेंडर बुकिंगसाठी २५ दिवसांचे अंतर समान राहणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा बदल तातडीने लागू करण्याचे निर्देश देशातील सर्व ऑइल मार्केटिंग कंपन्यांना देण्यात आले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धादरम्यान LPG पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला होता. त्यामुळे ९ मार्च २०२६ रोजी शहरी भागात रिफिल बुकिंगमधील अंतर २५ दिवस, तर १२ मार्च रोजी ग्रामीण भागात हे अंतर ४५ दिवस करण्यात आले होते.

सध्या LPG पुरवठ्याच्या स्थितीत सुधारणा झाली आहे आणि प्रलंबित बुकिंगची संख्याही कमी झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांवर लागू असलेले हे निर्बंध हटवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान १ सप्टेंबर रोजी तेल कंपन्यांनी कमर्शियल LPG सिलेंडरच्या किमतीत ११.५० रुपयांची वाढ केली आहे. याशिवाय ५ किलो वजनाचा छोटा सिलेंडरही २ रुपयांनी महाग झाला असून, त्याची किंमत आता ७६४ रुपये झाली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## मराठा आरक्षण आणि कुणबी नोंदी

राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि कुणबी नोंदींच्या प्रमाणीकरणाचा विषय सध्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधून काढलेल्या तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी आता ग्रामपंचायतींमध्ये अधिकृतपणे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. या प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि पात्र लाभार्थ्यांना विनाअडथळा जात प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. प्रशासकीय यंत्रणेने योग्य समन्वय साधून या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी, ही काळाची गरज आहे. मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर आणि जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन मंत्री विखे पाटील यांनी आतापर्यंत झालेल्या कामाचा सखोल आढावा घेतला. परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने कुणबी नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत, त्याच धर्तीवर इतर जिल्ह्यांनीही तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. कायद्याचे काटेकोर पालन करून आणि वंशावळीच्या कायदेशीर नियमांचे योग्य ते मूळ कागदपत्र तपासत आतापर्यंत मराठवाड्यात साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाले आहे. कायदेशीर चौकटीत राहूनच प्रमाणपत्रे दिली जातील, ही भूमिका स्पष्ट करतानाच सरकारने इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला न्याय देण्याची आपली भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या राजकीय आणि सामाजिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सरकारने अत्यंत संयमी आणि सकारात्मक भूमिका घेतली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी नेहमीच राहिली असून, मागील आंदोलनातील अनेक मागण्यांवर अंमलबजावणीही करण्यात आली आहे. मात्र, या प्रक्रियेत काही घटकांकडून विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्या०ll चे दिसून येते. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका घटकाचा नसून तो संपूर्ण समाजाच्या समतोलाशी जोडलेला आहे. त्यामुळे कायदेशीर बाबींची पूर्तता करत आणि प्रशासकीय यंत्रणेला अधिक सक्रिय करत पात्र लाभार्थ्यांपर्यंत लवकरात लवकर लाभ पोहोचवणे, हाच यावरील सर्वोत्तम उपाय ठरणार आहे.

## जटवाडा रोडवर देशी पिस्तूल व जिवंत काडतुसे बाळगणारे दोघे अटकेत



**अजिंठा प्रतिनिधी :** बेगमपुरा पोलिसांची कारवाई;६३ हजारांचा मुद्देमाल जप्त, तीन दिवसांची पोलीस कोठडी. जटवाडा रोड परिसरात देशी बनावटीचे पिस्तूल व तीन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोन तरुणांना बेगमपुरा पोलिसांनी तत्काळ अटक केली. पोलिसांनी केलेल्या कारवाईत पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि दोन मोबाईल असा एकूण ६३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी (PCR) सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरबाज अलीम शेख (वय १९, रा. जटवाडा गाव) आणि खान अय्यान नईम खान (वय २१, रा. जफर पार्क, जटवाडा रोड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.०५ वाजता जटवाडा रोडवरील गॅलेक्सी टर्फ परिसरात पोलिसांनी कारवाई केली. यावेळी अरबाज अलीम शेख याच्या ताब्यातून सुमारे ४० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल तसेच ३ हजार रुपये किमतीची तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याशिवाय त्याच्याकडील सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकूण ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. चौकशीदरम्यान अरबाज याने सदर पिस्तूल व काडतुसे खान अय्यान नईम खान याने आपल्याकडे दिल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी अय्यान खान यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे १० हजार रुपये किमतीचा इनफिनिक्स जीटी कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला.

दरम्यान, दोन्ही आरोपींच्या मोबाईलची तपासणी केली असता अरबाज शेख याच्या मोबाईलच्या फोटो गॅलरीमध्ये पिस्तूलचे फोटो व व्हिडिओ आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## खासगी शिकवणी केंद्र नियमन कायद्याच्या मसुद्यावर नागरिकांना सूचना-हरकती नोंदविण्यास संधी

**मुंबई :** महाराष्ट्र खासगी शिकवणी केंद्र (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६ च्या मसुद्याला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. नागरिक, पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि खासगी शिकवणी क्षेत्राशी संबंधित घटकांना आपल्या सूचना व हरकती मांडण्यासाठी अधिक वेळ मिळावा, यासाठी मसुद्यावर अभिप्राय सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे.

शिक्षण संचालक (माध्यमिक) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत सूचना व हरकती सादर करता येणार आहेत. त्यामुळे संबंधित नागरिक आणि घटकांनी या मुदतीत आपल्या सूचना, मते तसेच आक्षेप नोंदवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाने महाराष्ट्र खासगी शिकवणी केंद्र (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६ चा मसुदा तयार करून तो मराठी व इंग्रजी भाषेत विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. या मसुद्यावर नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. या संदर्भात ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत तब्बल ११ हजार ४१० सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त अभिप्रायांचा व्यापक विचार करून अंतिम कायदा अधिक सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सर्व गोशाळांना बैलपोळासणासाठी लागणारे सजावटीचे साहित्य सर्व मोफत व आर्थिक मदत करण्याची मागणी कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** :-गौरक्षक सेना महाराष्ट्र - कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने माश्री जिल्हाधिकारी साहेब, यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात येते बैलपोळ्याच्या सजावटीचे साहित्य सर्व मोफत देणे बाबत, सर्व गोशाळेला पोळ्याचे सजावटीचे रंग गोंडे घागर माळी मोरक्या साहित्य मोफत देणे बाबत, शेतकरी व गोशाळा आणि गोसेवक गोरक्षक यांचा सन्मान सत्कार गौरव करणे बाबत, महाराष्ट्रातल्या सर्व गोशाळा चारापाण्याची आर्थिक मदत करणे ,अशा संदर्भ- पाऊस कमी पडल्यामुळे म्हणून सर्व शेतकऱ्यांना बैलपोळ्याच्या सणासाठी लागणारे सजावटीचे साहित्य साठी आर्थिक मदत करण्यात यावी महोदय वरील विषय अनुसरून गौरक्षक सेना महाराष्ट्र - कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी च्या वतीने महाराष्ट्र हा कृषिप्रधान राज्य आहे यामध्ये सध्या कोरडा दुष्काळ पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांकडे पिका चे खूप नुकसान झाले आहे म्हणून येणार आहे शेतकऱ्याचा सर्वात मोठा सण म्हणजे बैलपोळा बैलपोळा उत्सव हा सर्व शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात साजरे करतात यासाठी सर्व शेतकऱ्यांना पिकाचे नुकसान झाल्यामुळे अडचण आली आहे महाराष्ट्रातल्या सर्व गोशाळांना बैलपोळ्याचे लागणारे सजावटीसाठी साहित्य रंग घागरमाळे गोंडे मोरक्या मोरक्या दोरी बाशिंग अन्य प्रकारचे



साहित्य तात्काळ उपलब्ध करून व सर्व मोफत देण्यात यावे त्यांच्या प्रत्येक गोशाळेच्या अकाउंट मध्ये आर्थिक मदत तात्काळ करण्यात यावी त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांना पोळ्याच्या सणासाठी लागणारे साहित्य मोफत व आर्थिक मदत त्यांच्या खात्यामध्ये टाकावी आणि महाराष्ट्रातल्या सर्व गोशाळेसाठी चारापाण्यासाठी पोळा विशेष पॅकेज घेऊन आर्थिक मदत देण्यात यावी आणि पोळ्याच्या निमित्ताने शेतकरी व गोशाळा गोरक्षक गो पालक यांचा सन्मान गौरव सत्कार पुरस्काराने सन्मानित करावी अशा सर्व शेतकऱ्यांसाठी व गोशाळेसाठी मागण्या तात्काळ पूर्ण कराव्या अशी मागणी निवेदनाच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात येत आहे पोळ्यासाठी लागणारे सजावटीचे साहित्य सर्व मोफत देण्यात यावे ही नम्र विनंती करण्यात येते

गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर (संस्थापक अध्यक्ष कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तालुका मानवत जिल्हा परभणी ),ज्ञानराज माऊली गोशाळा परळी तालुका परळी जिल्हा बीड संस्थापक अध्यक्ष तथा गौरक्षक सेना मराठवाडा अध्यक्ष गोकथाकार ज्ञानेश्वर महाराज उखळीकर, गौरक्षक सेना मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्षश्री श्री 1008 महामंडलिकेश्वर सचितानंद सरस्वती स्वामी अशोक महाराज पवार , जिवरक्ष गोशाळा पान्हेरा तालुका जिल्हापरभणीअध्यक्ष-गौरक्षक सेना प्रभारी जिल्हाध्यक्ष कृष्णा घुले,श्री संत विठोबा महाराज गोशाळा ताडबोरगाव तालुका मानवत जिल्हा परभणी चे अध्यक्ष श्याम पठाडे ,चंपालाल देवतवाल ठाकूर , पैलवान भागवत बोबडे ,अँड निवृत्ती कदम यांच्यासह गोपालक गौरक्षक गोप्रेमी गोभक्त उपस्थित होते

अशी माहिती कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी चे चेअरमन गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

## घाटीत ‘स्पायना बिफिडा’साठी स्वतंत्र मासिक क्लिनिक; बहुविद्याशाखीय कार्यशाळेत तज्ज्ञांचे मार्गदर्शन; 15 मुलांची वैद्यकीय तपासणी

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : जन्मजात दोषामुळे लहान मुलांमध्ये पक्षाघातासह विविध शारीरिक समस्या निर्माण करणाऱ्या ‘स्पायना बिफिडा’ या आजाराबाबत जनजागृती आणि उपचारव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शल्यचिकित्सा विभाग आणि ‘स्पायना बिफिडा फाउंडेशन’ यांच्या संयुक्त विद्यमाने बहुविद्याशाखीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी स्पायना बिफिडा रुग्णांसाठी घाटीत स्वतंत्र ‘मासिक क्लिनिक’ सुरू करण्याची घोषणा केली.

घाटीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे आणि शल्यचिकित्सा विभागप्रमुख डॉ. सरोजिनी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (६) ही कार्यशाळा झाली. शल्यचिकित्सा विभागातील डॉ. अबोली हुकेरी, डॉ. जगन्नाथ काळे, डॉ. मनाली कामत आणि डॉ. शुभम ढमढेरे यांनी आयोजनाची जबाबदारी सांभाळली.



‘स्पायना बिफिडा’ या जन्मजात आजाराबाबत समाजात अद्याप पुरेशी जनजागृती नसल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. ‘स्पायना बिफिडा फाउंडेशन’चे अध्यक्ष डॉ. संतोष करमरकर यांनी गर्भधारणेपूर्वी आणि गर्भावस्थेच्या सुरुवातीच्या काळात फॉलिक ॲसिडचे सेवन केल्यास या आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो, याबाबत मार्गदर्शन केले.

न्यूरोसर्जन डॉ. नितीन कोटेचा, ज्येष्ठ बालशल्यचिकित्सक डॉ. विवेक घारपुरे, बालशल्यचिकित्सक डॉ. राजीव तोतला, बालरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत जोशी, भ्रूण औषधवैद्यक तज्ज्ञ डॉ. प्रार्थना शाह आणि फिजिओथेरपिस्ट डॉ. अजय भारसाट यांनी विविध उपचारपद्धती, पुनर्वसन आणि रुग्णांच्या सर्वंकष काळजीबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला विविध पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.

शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर, डॉ. प्रशांत भिंगारे आणि डॉ. रामदास नागरगोजे यांनी दृक्-श्राव्य माध्यमातून स्पायना बिफिडाबाबत माहिती दिली. या आजारावर मात करून यशस्वी करिअर आणि उत्तम जीवन जगणाऱ्या व्यक्तींनीही आपले अनुभव कथन केले. तसेच तबल्याच्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली. दरम्यान, या उपक्रमाचा एक भाग म्हणून ५ सप्टेंबर रोजी शहरातील १५ मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. घाटीत सुरू होणाऱ्या स्वतंत्र मासिक क्लिनिकमुळे स्पायना बिफिडा रुग्णांना नियमित तपासणी, उपचार आणि पुनर्वसनासाठी एकाच ठिकाणी तज्ज्ञ सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शासकीय दंत महाविद्यालयात टू-व्हीलर मेकॅनिक बांधवांची सेवा

### औरंगाबाद टू-व्हीलर मेकॅनिक असोसिएशनचा सामाजिक उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्णांना आणि कर्मचाऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या खुर्च्या व व्हीलचेअरची दुरुस्ती करून औरंगाबाद टू-व्हीलर मेकॅनिक असोसिएशनच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. असोसिएशनच्या वतीने शुक्रवारी (४) हा सेवा उपक्रम राबविण्यात आला.



रुग्णांसाठी वापरण्यात येणाऱ्या तीन आसनी १६ खुर्च्यांची वेल्डिंग तसेच नट-बोल्टच्या साहाय्याने दुरुस्ती करण्यात आली. तसेच बाह्यरुग्ण विभागातील (ओपीडी) तीन कार्यालयीन खुर्च्या आणि एका व्हीलचेअरचीही दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे रुग्णालयातील दुरुस्तीअभावी वापरात नसलेल्या साहित्याचा पुन्हा उपयोग होणार आहे.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. माया इंदुरकर, उपाधिष्ठाता डॉ. किशोर महाले, डॉ. प्रज्ञा वाडीकर बनसोडे, डॉ. राजन महिंद्रा, डॉ. जगदीश वठार, डॉ. चंदूलाल ढालकरी, डॉ. कांचन शहा, डॉ. जयश्री पगारे, डॉ. प्रितेश गवळी आणि डॉ. मंदाकिनी मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष चांद सय्यद यांनीही उपक्रमासाठी सहकार्य केले.

या सामाजिक उपक्रमात बीएस-६ व इलेक्ट्रिक वाहनांचे प्रशिक्षक उल्फत अन्सारी (झारखंड), शेरा भाई, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष राम पारखे, संघटनेचे उपाध्यक्ष शेख नुर, विभागप्रमुख शेख जमीर, सरवर खान, अजय राजपूत आणि मिनाज पठाण यांनी सहभाग घेतला.

औरंगाबाद टू-व्हीलर मेकॅनिक असोसिएशनच्या वतीने यापूर्वीही घाटी रुग्णालय, कर्करोग रुग्णालय तसेच शहरातील विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. तांत्रिक कौशल्याचा उपयोग समाजसेवेसाठी करण्याचा संघटनेचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## सिल्लोड तालुक्यातील शिवणा येथे एचआयव्ही तपासणी व गुप्तरोग तपासणी शिबिर संपन्न यात अनेक गरजू रुग्णांनी घेतला आरोग्य सेवेचा लाभ

**अजिंठा प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अंतर्गत जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे , जिल्हा पर्यवेक्षक श्री संजय पवार , आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था या संसथेचे अध्यक्ष मनसुख भाऊ झांबड व प्रकल्प संचालक श्री अप्पासाहेब पाटील उगले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या जिल्हा साधन व्यक्ती श्रीमती अन्नपूर्णा ढोरे मॅडम यांच्या उपस्थितीत आज दिनांक 7/9/2026 रोजी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (एम जी




व्ही एस ) छत्रपती संभाजीनगर अंतर्गत लिंकवर्कर प्रकल्पातील शिवणा गाव तालुका सिल्लोड येथे शिवणा प्राथमिक आरोग्य केंद्र आणी लिंकवर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने हेल्थ कॅम्प घेण्यात आला, कॅम्प प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणा येथे घेण्यात आला, सदर कॅम्प मध्ये एकुण 38. लोकांचे एचआयव्ही व गुप्तरोग तपासणी करण्यात आली यात उपस्थित लोकांचे एचआयव्ही तपासणी महेंद्र पाटील यांनी केले वनिता शिनगारे सुपरवायझर यांनी लोकांना निरोध चे वाटप केले व उपस्थित लोकांना एचआयव्ही एड्स विषयी सविस्तर माहिती लिंक वर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी दिली तसेच इतर लोकांची शुगर बीपी तपासून त्यांना योग्य तो वैद्यकीय सल्ला डॉक्टर आकाश पाटील दौंड वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणा यांनी दिला यावेळी उपस्थित श्री इकबाल कासम तडवी बागुल समाजसेवक संतोष इंगळे समुदाय आरोग्य अधिकारी उन्मेष उबाळे सुपरवायझर आरोग्य सेवक सतिष पाटील शिंदे शंकर पवार मोहन धनइ गजानन भोलाने राणा प्रवीण सिंह जाधव आरोग्य सेविका संगीता पाटील दौड पुजा ससाणे रिता काथार शितल कांबळे सोनल पडघान/चेके लिपिक ममता झलवार डाटा एन्ट्री ऑपरेटर आशा वर्कर व शिवणा प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी कर्मचारी या वेळी उपस्थित होते तसेच उपस्थित लोकांना लिंक वर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी लिंक वर्कर प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन या कॅम्प मध्ये गरोदर मातांची सुद्धा एचआयव्ही तपासणी करण्यात आली तसेच उपस्थित लोकांना एचआयव्ही होण्याचे मुख्य चार कारणे सांगण्यात आले व आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी त्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी आरोग्य सेविका सिस्टर संगीता दौड यांनी विशेष परिश्रम घेतले व नियोजन केले आणि उपस्थित सर्व लोकांना आरोग्य विषयी सविस्तर माहिती दिली

## पावसाअभावी खरीप पीक गेले वाया, बैलपोळा सणावर दुष्काळाची छाया!; उद्या खांदामळणी, बाजारांत निरुत्साह

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

बैलपोळा सण दोन दिवसांवर येवून ठेपला आहे. यंदा बहुतांश भागांत अद्याप पुरेसा पाऊ स नसल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. खरीप वाया गेले, रब्बीचीही आशा मावळली आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी, १० सप्टेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या श्रावणी बैलपोळा सणावर दुष्काळाचे गडद सावट निर्माण झाले आहे. पोळ्याचे बाजार सुनेसुने दिसून येत असल्याचे चित्र आहे. शेतकरी बैलपोळ्यानिमित्त बैल सजावटीचे साहित्य तसेच अन्य वस्तूंची खरेदी करतात. मात्र, यंदा या खरेदीसाठी शेतकऱ्यांचा म्हणावा तसा उत्साह दिसून येत नाही.

शेतकऱ्यांसाठी वर्षभरातील सणांमध्ये श्रावणी पोळा हा महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी बैल सजावटीच्या साहित्यासह अन्य वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. शेतीची तसेच पाऊस-पाण्याची स्थिती चांगली असल्यास पोळा सणाचा उत्साह अधिक असतो. पोळा आणि पाऊ स झाला भोळा, ही म्हण यंदा खोटी ठरली असून, पावसाअभावी शेती अडचणीत आली आहे. अनेक भागांत तुरळक पाऊस असून, अद्याप कुठेही पाणीही वाहिलेले नाही किंवा शेतीतून पाणी बाहेर पडलेले नाही. सव्वा महिन्यापासून पाऊस गायब झाल्याने कपाशी, तूर, सोयाबीन, मूग, उडीद आदी पिके पूर्णतः करपली आहेत. सुमारे ७५ टक्के खरीप पीक वाया गेल्याचे प्रगतशील शेतकरी वसंत पंढरीनाथ जगताप यांनी सांगितले. पावसाअभावी खरीप पिकांची झालेली दुरवस्था आणि शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी याचा थेट परिणाम पोळा सणाच्या खरेदीवर झाला आहे.

चिंताजनक स्थिती

जिल्ह्यात बहुतांश भागात पावसाच्या दीर्घ खंडामुळे जमिनीतील ओलावा संपला असून, कपाशीवर बोंडअळी पडण्यास सुरवात झाली आहे. सोयाबीनवर अळी, मुगावर चिकटा अळी, कपाशीवर मावा-तुडतुडे व मकावर रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. फवारणी, खुरपणी व निंदणीचा खर्च वाढला असून, मजूरटंचाईने शेतकऱ्यांना जेरीस आणले आहे. त्यामुळे उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पिके उत्पादनाच्या निर्णायक टप्प्यात असतानाच पावसाने ओढ दिल्याने चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे.

बैलांपोटी कृतज्ञता

बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी खांदामळणी आहे. या दिवशी सर्जा-राजाला ओढे-नद्यांवर आंघोळ घातली जाते. दुष्काळी स्थिती असल्याने गुरांना हिरवा चारा तर दूरच, पोळ्याला आंघोळ घालण्यासाठी पाणी मिळणेही कठीण झाले आहे. बैलांच्या सजावटीसाठी रंग, गोंडे, झूल, वेसण आणि घुंगरमाळांनी दुकाने सजली आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे खरेदीचा उत्साह कमी असल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक गणितही बिघडले आहे. यंदाही पावसाने सुरवातीपासूनच ओढ दिल्याने खरीप पिके शेवटच्या घटका मोजत आहेत. आर्थिक संकट असतानाही शेतकरी आपल्या जिवाभावाच्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कसाबसा पोळा साजरा करण्याच्या तयारीत आहेत.


विक्रीत ५० टक्के घट

बैलपोळ्यानिमित्त आठवडे बाजारात खरेदीसाठी दरवर्षी शेतकऱ्यांची गर्दी उसळते. सर्जा-राजाच्या सजावटीसाठी बाजारात कासरा, म्होरकी, वेसण, गोंडे, रेशमी पट्टे, घंट्या, घुंगरू, घुंगरमाळा, फुगे, शिंगदोरी, शिंगगोंडा, जोते, झुली, बेगड, हिंगुळ, मणिमाळ, म्होरकी, बेगड, चमकी, गेरू, कवड्यांच्या माळा, फुलांचे हार, पितळाच्या घंटा, जोते आदी खरेदी जोरात होते. यंदा साज-शृंगाराच्या साहित्याच्या किमती गतवर्षीच्या तुलनेत दुप्पट वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यामुळे बाजारात खरेदीसाठी शेतकऱ्यांची संख्या घटल्याचे दिसून येत आहे. काहींनी जुन्याच साजाने पोळा साजरा करण्याचे ठरविले आहे. व्यापाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार यंदा पोळ्याच्या साजाची विक्री ५० टक्क्यांचे व्यापारी सुरेश देशमाने यांनी सांगितले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान'मध्ये सर्व विभागांनी सहभाग नोंदवावा




हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान आणि निर्णयक्षम करण्यासह सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२६-२७' जिल्ह्यातील सर्व विभाग व सर्व स्तरांवर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व विभागांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य) श्रीमती अनिता भालेराव यांनी केले आहे.

यावेळी मोटार वाहन निरीक्षक अविनाश मोराडे, जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी एस. व्ही. गिणगिणे, उपविभागीय अभियंता ज्ञा. बा. चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री. बी. आर. मोकळे, सहायक निबंधक रविराज तायडे, कृषि उपसंचालक एस. ए. जाधवर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत सेवांच्या गुणवत्तेत वाढ, लोकाभिमुखता, धोरणात्मक सेवांची अंमलबजावणी, ई-ऑफिसची प्रभावी अंमलबजावणी, ऑनलाइन पोर्टलवरील तक्रारींचा निपटारा, संसाधनांचा पर्यायी वापर, तंटा-तक्रारमुक्त कार्यालय, नाविन्यपूर्ण व पथदर्शी संकल्पना, प्रयोग व उपक्रम तसेच ई-पंचनामा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सहभाग या बाबींचा विचार करण्यात येणार आहे. वैयक्तिक स्तरावर उत्कृष्ट काम करणारे कर्मचारीही या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. अभियानातील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी **https:**//pragatiabhiyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.

स्पर्धेसाठी विचारात घेण्यात येणारा कालावधी २० ऑगस्टपासून एक वर्षाचा राहणार आहे. मात्र, प्रशासकीय सुधारणांशी संबंधित प्रस्ताव, कल्पना व नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी कालावधीची अट लागू राहणार नाही. अभियानाच्या कालावधीत महसूल अभियान, पंचायतराज अभियान, इंद्रधनुष्य अभियान आदी इतर उपक्रमही त्यांच्या मूळ स्वरूपात सुरू राहतील. या उपक्रमांतर्गत करण्यात आलेली कामगिरी अभियानाच्या निकषांमध्ये बसत असल्यास ती स्पर्धेसाठी विचारात घेता येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य) श्रीमती अनिता भालेराव यांनी सांगितले.

## प्रलोभनांच्या योजना निवडणुकीपुरत्याच! कामगारांच्या फसवणुकीविरोधात भीमशक्ती संघटनेचा एल्गार; तीव्र निदर्शने



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

निवडणुका जिंकण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात योजनांची गाजर दाखवायची, मते मिळवून सत्ता स्थापन करायची आणि नंतर हळूहळू त्या योजना बंद करून जनतेला वाऱ्यावर सोडायचे, असा सध्याच्या महायुती सरकारचा खाटाटोप असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. निवडणुकांपूर्वी बांधकाम कामगार आणि मजुरांसाठी सुरू करण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजना आता कागदावरच उरल्या असून प्रत्यक्ष वास्तवात त्या पूर्णपणे बंद झाल्याच्या जमा आहेत. बंद करण्यात आलेल्या या सर्व योजना तात्काळ पूर्ववत चालू कराव्यात आणि कामगारांची होणारी पिळवणूक त्वरित थांबवावी, या प्रमुख मागितीसाठी आज भीमशक्ती संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील कामगार उपायुक्त कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली आणि प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान कामगारांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर प्रशासनासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेच्या अखेरीस कामगार उपायुक्तांनी स्थानिक पातळीवरील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी अत्यंत सकारात्मक निर्णय घेतला आहे. तसेच, ज्या मागण्या शासन स्तरावर प्रलंबित आहेत, त्यासंदर्भातील सर्व प्रस्ताव तातडीने व गांभीर्याने शासनाकडे पाठवून पाठपुरावा करण्याचे ठोस आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले.

सध्याच्या सरकारवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढत कामगारांच्या हक्कासाठी पुढाकार घेतलेल्या या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी कैलास जुंबडे, भाऊसाहेब नवगीरे, पंडित भाई नवगीरे, राजू मंजुळे, सतीश नरवडे, किशोर जाधव, रवींद्र शेळके, भाऊसाहेब जगताप, अशोक डोळस, राहुल सावंत, सदानंद खडसन, मिलिंद बाहातरे आणि दयानंद मोकळे यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## बांधकाम विभागात अभियंता तायडे यांची नियुक्ती



**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता टाकसळ यांची नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे बदली झाली आहे त्यांच्या बदलीनंतर रिक्त झालेल्या जागी आता नवनियुक्त अभियंता तायडे यांनी आपला पदभार स्वीकारला आहे

पदभार स्वीकारल्यानंतर प्रतिनिधींनी त्यांची सदिच्छा भेट घेतली फर्दापूरमध्ये आल्यानंतर तुम्हाला कसे वाटले अशी विचारणा केली असता त्यांनी फर्दापूरकरांविषयी मोठे समाधान व्यक्त केले आपला अनुभव सांगताना अभियंता तायडे म्हणाले मी पदोन्नतीवर Promotion फर्दापूर येथे नियुक्त झालो आहे इथे आल्यानंतर मला खूप आनंद झाला येथील सर्व माणसं खूप चांगली आणि आपुलकीची वाटली त्यामुळे येथे काम करताना नक्कीच एक चांगला अनुभव मिळेल. अभियंता तायडे यांच्या या सकारात्मक दृष्टिकोनामुळे आणि त्यांच्या उत्साहपूर्ण पदभारामुळे फर्दापूर परिसरातील बांधकाम विभागाच्या कामांना आता अधिक गती मिळेल अशी मोठी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे परिसरातील रस्ते बांधकाम व इतर विकासकामे आता जलदगतीने मार्गी लागतील या आशेने नागरिकांनी नवीन अभियंत्यांचे मनापासून स्वागत केले आहे

## पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांसाठी विशेष कर्ज मेळाव्यांचे आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, :** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार तसेच जिल्हा अग्रणी बँक, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सुमारे ९३३ 'पीएम विश्वकर्मा' लाभार्थ्यांना कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष 'पीएम विश्वकर्मा क्रेडिट आउटरीच कॅम्प' आयोजित करण्यात येत आहेत.

ही शिबिरे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या संबंधित ब्लॉक शाखांमध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहेत. ही शिबिरे जिंतूर येथे बुधवार (दि.९), परभणी येथे गुरुवार (दि.१०) आणि पुर्णा येथे बुधवार, दि १६ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहेत. या

शिबिरास उपस्थित राहणाऱ्या लाभार्थ्यांनी कर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुकची छायांकित प्रत आणि पीएम विश्वकर्मा कार्ड सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश नोंदणीकृत पारंपरिक कारागीर व शिल्पकारांच्या कर्ज अर्जांचा जलदगतीने निपटारा करून त्यांना आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा आहे. पात्र लाभार्थ्यांनी संबंधित शिबिराचा लाभ घ्यावा. अधिक माहिती व सहाय्यासाठी ०२४०-२९५४०४० / ०२४५२-२४११८१ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अग्रणी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अध्यक्षपदी ॲड. रमेश वाकडे, सचिवपदी ॲड. श्रीमंत केदार

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शाळा न्यायाधिकारणात वकिली करणाऱ्या वकिलांचे हक्क, प्रतिष्ठा आणि संरक्षणासाठी कटिबद्ध असलेल्या 'द्? ॲडव्होकेट्स असोसिएशन ऑफ स्कूल ट्रिब्युनल'च्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. रमेश वाकडे तर - सचिवपदी ॲड. श्रीमंत केदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील शाळा न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर, जालना आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. नव्याने निवडण्यात आलेली ही कार्यकारिणी पुढील चार वर्षांच्या कालावधीसाठी कार्यरत असणार आहे.

नवनिर्वाचित संस्थेची कार्यकारिणी - उपाध्यपदी ॲड. दिपेश कर्णिक (पुरुष),

ॲड. निकिता गोरे (महिला), संयुक्त सचिवपदी ॲड. मेघराज चौधरी, ॲड. अमिता चाटे, तर खजिनदारपदी ॲड. संदीप सपकाळ, सदस्यपदी ॲड. राहुल खाडप, ॲड. प्रियंका काळे यांची निवड करण्यात आली आहे.

सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या बिनविरोध निवडीबद्दल वकील संघ, शैक्षणिक क्षेत्र, तसेच सामाजिक स्तरातून स्वागत व कौतुक केले जात आहे.

## सोयगाव तालुक्यात 'लाल्या'सह मावा, तुडतुड्यांचे थैमान; कापूस शेतकरी संकटात

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव दि.७ सप्टेंबर : घोसला परिसरात पावसाच्या ओढीनंतर रोगाचा प्रादुर्भाव; तातडीने मार्गदर्शनाची शेतकऱ्यांची मागणी

सोयगाव तालुक्यातील प्रमुख नगदी पीक समजल्या जाणाऱ्या कापसावर यंदा संकटांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. प्रारंभी पावसाच्या लांबलेल्या दडीमुळे बळीराजा चिंतेत सापडला असतानाच, आता कापसावर मावा आणि तुडतुड्यांपाठोपाठ 'लाल्या' रोगाचा तीव्र प्रादुर्भाव झाला आहे. घोसला परिसरासह तालुक्यातील कापूस पिकावर या रोगाने थैमान घातल्याने शेतकरी पार हवालदिल झाले आहेत.

चालू वर्षात सोयगाव तालुक्यात अंदाजे जवळपास २९ हजार ९०० हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड झालेली आहे. मात्र, ऐन भरात आलेल्या पिकावर एकापाठोपाठ एक रोगांचे आक्रमण होत असल्याने



यंदा कापसाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दुष्काळात तेरावा महिना

गेल्या वर्षी अतिवृष्टीच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागला होता. त्यातच बाजारात कापसाला अपेक्षित भाव न मिळाल्याने मिळालेल्या कवडीमोल दरामुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत सापडला होता. या सर्व संकटांतून शेतकरी सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच, यावर्षी पावसाने मारलेली दडी आणि आता पिकावर उद्भवलेला 'लाल्या' व किडींचा प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशाच पडण्याची चिन्हे दिसत आहेत.

कृषी विभागाने तातडीने मार्गदर्शन करावे

कापसाची झाडे पिवळी व लाल पडू लागल्याने आणि पानांवर किडींचा मोठा हल्ला झाल्याने पिकाचे रक्षण कसे करावे, याबद्दल शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे कृषी विभागाने घोसला व परिसरातील शेतांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी आणि शेतकऱ्यांना योग्य फवारणी व उपायांचे तातडीने मार्गदर्शन करावे, अशी आर्त हाक परिसरातील बळीराजाने दिली आहे.

> **"संकटातून सावरणे कठीण; कृषी विभागाने मदत करावी!"**
>
> "गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि कापसाला मिळालेला कवडीमोल भाव यातून शेतकरी अजून सावरलेला नाही. यावर्षी पावसाने ओढ दिली असून, त्यातच कापसावर लाल्या रोग व मावा-तुडतुड्यांनी थैमान घातले आहे. यामुळे कापसाचे उत्पादन घटण्याची शक्यता नाकारता येत नाही. कृषी विभागाने लवकरात लवकर शेतात येऊन मार्गदर्शन व मदत करावी."
>
> — लक्ष्मण अर्जुन पाटील (शेतकरी, घोसला)

## आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी,--आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी ईपर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार श्री.वाकोदकर, मिलिंद सिनगारे आदींसह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे शिक्षक दिनी "विद्यार्थी स्वयंशासन दिन" उपक्रमाने साजरा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.७ सप्टेंबर

छात्र अध्यापक अध्यापिका यांनी स्वयंशासन दिनानानिमित अध्यापन व शालेय कामकाज सांभाळून आपल्या शिक्षक गुरू यांचा केला सन्मान.

कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिनी विद्यार्थी यांनी छत्र अध्यापक व अध्यापिका भूमिका पार पडून साजरा केला. मुख्याध्यापक म्हणून ऋषिकेश पाटील,उपमुख्याध्यापक हेमंत खेडकर,पर्यवेक्षक मनोज उबाळे,साई बोखारे,छात्र अध्यापक प्रांजल पाटील,वेदिका पवार, सानिका महाजन,भावेश



खैरनार,सोनम आगे,रिद्धी पाटील,सायली वामने,प्रथमेश मिसाळ,यश बघेल,विराज राऊत,साची वाघ,दीपाली बोडखे,नंदिनी पाटील,जान्हवी कापरे,पल्लवी तरटे,हर्षल मोरे वैष्णवी फुसे,आदि यांनी कामकाज पाहिले.परिपाठ पासून उपक्रमाला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रतिमा अभिवादन करून उपक्रम सुरू करण्यात आला.दिवसभर सर्व छात्र अध्यापक यांनी अध्यापन केले व सर्व शालेय कामकाज विद्यार्थी अध्यापक यांनी पार पाडले उत्कृष्ट छात्र अध्यापक म्हणून हेमंत खेडकर,वेदिका पवार,सोनम आगे,ऋषिकेश पाटील,यांची निवड करण्यात आली.स्वयंसेवक दुर्गेश जोशी,याने कामकाज पाहिले. यावेळी सर्व छात्र अध्यापक यांनी आपल्या गुरूंचा सत्कार करीत भेट देऊन सन्मान केला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक दादासाहेब पवार,यांची प्रमुख उपस्थित होती.यावेळी विद्यार्थी यांनी आपल्या शिक्षक यांचे प्रति व आज आलेल्या अनुभव कथन केले,सत्कार उत्तर देताना शाळेचे मुख्याध्यापक प्राध्यापक निलेश पाटील,आशा पंडित,भाग्यश्री काळे,सागर घाटे यांनी शिक्षकांचे जीवनातील स्थान तसेच विद्यार्थी अध्यापक यांचे कौतुक प्रमुख पाहुणे यांनी केले यावेळी मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,योगेश काळे,अंजली कथळकर,रुपाली मानकर,शीतल पवार,मनीषा पाटील,शीतल गावंडे,सागर पाटील,उमेश जाधव,विद्या पाटील,अरुणा भोई,रंजना जाधव,वैशाली खेडकर,शीतल जाधव,प्रणय कुलकर्णी,श्रुती दुसाने,शिक्षक सेवकज्ञानेश्वर पंडित,रमेश कंडारे,संजय डापके,कृष्णा गोतमारे,यांचे सह सर्व छात्र अध्यापक अध्यापिका,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र समीक्षा ताडे व प्रांजल विसपुते हिने केले.

## परभणी जिल्ह्यात बुधवारपासून 'राष्ट्रीय पोषण माह'

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** कुपोषणमुक्त आणि निरोगी समाजनिर्मितीसाठी जिल्हा परिषदेचा महिला व बाल विकास विभाग सज्ज झाला आहे. दि. ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत परभणी जिल्ह्यात 'राष्ट्रीय पोषण माह २०२६' चे भव्य आयोजन करण्यात येणार आहे. 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' या मुख्य संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या मोहिमेत पोषण, सार्वजनिक आरोग्य आणि बालसंगोपनाबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर आणि महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती आर. पी. कळम यांनी या उपक्रमाची रूपरेषा जाहीर केली आहे. राष्ट्रीय पोषण माहातील मुख्य उपक्रमात स्थानिक पातळीवर उपलब्ध असणाऱ्या पोषक अन्नधान्याचा समावेश आहारात कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व मार्गदर्शन पालकांना दिले जाईल. अंगणवाड्यांमध्ये ताजा, गरम आणि उच्च दर्जाचा शिजविलेला आहार उपलब्ध करून देण्यासह स्वच्छतेला प्राधान्य दिले जाईल. 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' ही भावना वाढीस लावण्यासाठी स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविला जाईल.

अंगणवाडी व्यवस्थापन समितीला अधिक सक्षम करून आहाराची गुणवत्ता तपासली जाईल. ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडी सेविका सुधारित वेळापत्रकानुसार घरोघरी जाऊन पालकांचे समुपदेशन करतील. बालकांमधील शारीरिक किंवा मानसिक विकासातील विलंब ओळखून त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी संदर्भित केले जाईल.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी नोंदणी मोहीम तीव्र केली जाईल.

## शिक्षक दिनानिमित्त ज्ञानदात्यांना मानाचा मुजरा; विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यात शिक्षकांची मोलाची भूमिका

**जिंतूर /प्रतिनिधी :** येथील जि प के प्रा. क्र. 1 येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ आणि तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस शिक्षकांना समर्पित करण्यात आला सदर कार्यक्रम दीपस्तंभ प्रतिष्ठान व सर्जरी बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमानाने साजरा करण्यात आला यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रगती नेवल, त्र्यंबक पोले, सिराज सिद्दीकी, मयूर जोशी मुसाभाई कुरेशी व दीपस्तंभ प्रतिष्ठानचे विराज बोर्डीकर, आदित्य देशमुख,प्रथम चव्हाण, गुप्तेश भांडारी व संजरीबिल्डर्स अब्दुल नाफे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, विचारांची आणि संस्कारांची जडणघडण करणारे मार्गदर्शक असतात. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, मेहनत आणि प्रेरणा यांचा मोठा वाटा असतो. शिक्षक दिनानिमित्त विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे,



निबंध स्पर्धा, गुरू-शिष्य संवाद तसेच शिक्षकांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे शाळेच्या वतीने घेण्यात आले या दिवशी विद्यार्थी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या योगदानाचा प्रशांसा कारण्यात आली

आजच्या डिजिटल युगात शिक्षणाच्या पद्धती झपाट्याने बदलत असल्या तरी शिक्षकांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणे, तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकवणे आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे ही शिक्षकांची जबाबदारी अधिक महत्त्वाची झाली असल्याचे यावेळी मुख्याध्यापक शाहाबोद्दीन सर यांनी सांगितले

## विंधणे कोळीवाडा येथे एकविरा आई प्रसन्न मच्छीमार सहकारी संस्था मर्यादित विंधणेची स्थापना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड

रविवार दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उरण तालुक्यातील विंधणे कोळीवाडा येथे एकविरा आई प्रसन्न वि. का. सहकारी संस्था मर्यादित विंधणे कोळीवाडा या सहकारी संस्थेचा उद्घाटन समारंभ मोठे उत्साहात कुलदैवत मंदिरासमोरील पटांगणात पार पाडला.

कोळीवाड्यातील स्थानिक मच्छीमार बांधवांच्या विकासासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व गोरगरीब मच्छीमारांना शासनाच्या विविध सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.



कार्यक्रमाची सुरुवात दिघोडे कांदळवन समितीचे अध्यक्ष व पारंपारिक मच्छीमार संस्थेचे सेक्रेटरी प्रितेश काशिनाथ कोळी यांच्या प्रास्ताविक पर भाषणाने झाले त्यामध्ये त्यांनी संस्थेच्या स्थापनेच्या उद्देश आणि रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली.

या भव्य कार्यक्रमासाठी उद्घाटक व मार्गदर्शक तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पारंपरिक मच्छिमार बचाव व सामाजिक कृती समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ अभ्यासक रमेश भास्कर कोळी यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून उपस्थित मच्छीमार बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले व संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी गव्हाण सहकारी संस्थेचे चेअरमन हितेश कोळी हे देखील आवर्जून उपस्थित होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मच्छीमारांच्या सहकार्याबद्दल महत्त्वाचे विचार मांडले व कोळी बांधवांसाठी असलेल्या विविध शासकीय योजना विषयी मार्गदर्शन केले तसेच दिघोडे पारंपारिक मच्छीमार संस्थेचे चेअरमन अशोक कोळी, कुंडेगाव सहकारी संस्थेचे पदाधिकारी भानुदास कोळी, तानाजी कोळी,गव्हाण मच्छिमार सहकारी संस्थेचे पदाधिकारी भरत कोळी, प्रकाश कोळी, वैभव कोळी या सोहळ्याला उपस्थित राहून संस्थेला मार्गदर्शन करून पाठबळ दिले.

विंधणे खालचा पाडा गावचे अध्यक्ष कृष्णा माळी, माजी ग्रामपंचायत सदस्य मनीषा कोळी, संस्थेचे सचिव आशिष कोळी, संस्थेचे खजिनदार शैलेश कोळी, संस्थेतील पदाधिकारी कृष्णा कोळी, सतीश कोळी, पंकज कोळी,आर्यन कोळी,संतोष कोळी, विनोद कोळी,राजेश कोळी, विनायक कोळी,अर्चना कोळी, धनश्री कोळी, शर्मिला कोळी,अस्मिता कोळी, उज्वला कोळी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी सदस्य यासोबतच गावचे ग्रामस्थ पदाधिकारी व परिसरातील मच्छिमार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण व नेटके सूत्रसंचालन रुपेश पाटील सर यांनी आपल्या सुमधुर वाणीतून संपूर्ण सोहळ्यात रंगत आणली. विंधणे एकविरा आई प्रसन्न मच्छीमार सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक चेअरमन सुनील बाळाराम कोळी यांनी उपस्थित सर्व पाहुण्यांचे व जमलेल्या ग्रामस्थांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. विंधणे कोळीवाडा येथे पार पडलेल्या या यशस्वी सोहळ्यामुळे परिसरातील मच्छीमार बांधवांमध्ये आनंदाचे व उत्सवाचे वातावरण पसरले आहे.

# जिल्ह्यातील शाळा परिसर तंबाखूमुक्त करा; जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे कडक निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी आणि शाळा व शैक्षणिक संस्थांचा परिसर पूर्णपणे तंबाखूमुक्त करावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत. तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय व सनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीस अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी छाया आवरगावकर, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे आकाश तळवलकर, अन्न व औषध प्रशासनाचे डी. व्ही. पाटील, कामगार अधिकारी अक्षय ठोकळ यांच्यासह आरोग्य, शिक्षण, पोलीस आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शाळा व शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. नियमानुसार शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीस प्रतिबंध असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. प्रत्येक शाळेने 'तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था' यासाठी निश्चित केलेल्या सर्व निकषांची पूर्तता करणे बंधनकारक असून, शिक्षण विभागाने यात नियमित कार्यवाही करावी, असे त्यांनी नमूद केले.

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम (COTPA-२००३) च्या अंमलबजावणीसाठी विशेष पथके सक्रिय करण्यात यावीत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच, तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिराती तसेच प्रायोजकत्वासंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांमध्ये आणि युवकांमध्ये तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक गंभीर दुष्परिणामांची माहिती देण्यासाठी ग्रामपंचायती, शाळा-महाविद्यालये आणि विविध शासकीय विभागांच्या सहभागातून तंबाखूविरोधी जनजागृती मोहीम अधिक व्यापक करावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

बैठकीच्या शेवटी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध विभागांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या व आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. संबंधित सर्व विभागांनी केलेल्या कारवाईचा अहवाल नियमितपणे जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाकडे सादर करावा, अशा सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता ९ वी व ११ वीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जवाहर नवोदय विद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी इयत्ता ९ वी आणि ११ वीच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी ‘लॅटरल एन्ट्री सिलेक्शन टेस्ट-२०२७’ आयोजित करण्यात आली आहे. आगामी १० एप्रिल २०२७ रोजी ही प्रवेश परीक्षा घेतली जाणार असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन जवाहर नवोदय विद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत इयत्ता ९ वीच्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार, अर्ज करणारा विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा मूळ रहिवासी असणे बंधनकारक असून, तो चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये त्याच जिल्ह्यातील मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता ८ वीमध्ये शिकत असला पाहिजे. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा आणि इयत्ता ८ वीचे अध्ययनाचे ठिकाण एकच असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याची जन्मतारीख १ मे २०१२ ते ३१ जुलै २०१४ या कालावधीतील (दोन्ही तारखा धरून) असावी. इयत्ता ९ वीच्या प्रवेशासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना **https**://cbseitms.nic.in/2026/nvsix_9 या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करता येईल.

दुसरीकडे, इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी देखील असेच सुस्पष्ट नियम लागू करण्यात आले आहेत. इयत्ता ११ वीत प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा मूळ रहिवासी असावा आणि शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता १० वीमध्ये शिकत असणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र ठरणार नाहीत. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा आणि इयत्ता १० वीचे अध्ययनाचे ठिकाण एकच असावे. या श्रेणीसाठी विद्यार्थ्याची जन्मतारीख १ जून २०१० ते ३१ जुलै २०१२ या कालावधीतील (दोन्ही तारखा धरून) असणे आवश्यक आहे. इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी **https**://cbseitms.nic.in/2026/nvsxi_11 या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत.

नवोदय विद्यालयासारख्या प्रतिष्ठीत शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेण्याची ही विद्यार्थ्यांना एक उत्तम संधी उपलब्ध झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी कोणत्याही विलंबाशिवाय ठरवून दिलेल्या मुदतीत आपले ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे विशेष आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# वेळ वाढवून देण्याची नगरसेवकांची मागणी; अपात्रता प्रकरणातील सुनावणीत आयुक्तांसमोर युक्तिवाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वॉर्डांमधील अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम आणि दोनपेक्षा अधिक अपत्ये यांसारख्या मुद्द्यांवरून सुरू असलेल्या नगरसेवकांच्या सदस्यत्व अपात्रता प्रकरणात सुनावणीचे सत्र तीव्र झाले आहे. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्यासमोर आज ९ नगरसेवकांची सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान, संबंधित नगरसेवकांनी बचावासाठी व आपले लेखी म्हणणे व कागदपत्रे व्यवस्थित मांडण्यासाठी आम्हाला अतिरिक्त वेळ मिळावा, अशी आग्रही मागणी केली आहे.

अतिक्रमण व अपत्य प्रकरणांवर सुनावणीत नगरसेवकांनी एक मुखी मुदतवाढीची मागणी केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) आणि १० (१-D) नुसार दाखल झालेल्या अर्जांवर आज आयुक्तांसमोर सुनावणी घेण्यात आली. यामध्ये फरजाना गुलाम रसूल, मुंशी भिकन शेख, पठाण मझर, स्वामी विश्वनाथ गुरुलिंग, अली मीर वाजेद, अशोक हिवराळे आणि अब्दुल समीर या नगरसेवकांचा समावेश होता. या सुनावणीत नगरसेवकांनी बाजू मांडताना, आरोपांवर सविस्तर प्रत्युत्तर देण्यासाठी आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुरेशी संधी व अतिरिक्त वेळ देण्यात यावा, अशी विनंती केली.

नगरसेवकांच्या या भूमिकेची दखल घेत, त्यांनी मागणी केल्यानुसार म्हणणे मांडण्यासाठी अतिरिक्त वेळ दिला जाणार असून, त्याबाबतची पुढील तारीख लवकरच लेखी स्वरूपात कळविण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिका निवडणूक विभागातर्फे देण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी आगामी १५ सप्टेंबर रोजी आणखी ११ सदस्यांची सुनावणी होणार असल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# ‘भगवान महावीरांना हृदयात स्थान द्या’ : आचार्य हेमसागरजी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर येथील १००८ श्री चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात सुरू असलेल्या इंद्रध्वज महामंडल विधानाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रतिष्ठाचार्य अकलंक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी भक्तिभावाने सुरू आहेत.

६ सप्टेंबर रोजी भगवान चंद्रप्रभूंच्या शांतिधारेचा मान हर्षा प्रविणकुमार गंगवाल परिवार, जालना यांना मिळाला. आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या पादप्रक्षालनाचे सौभाग्य शीला-संजयजी, संदेशजी व रितेशजी कासलीवाल परिवाराला, तर सायंकाळच्या आरतीचा मान अल्का वर्धमानजी कासलीवाल परिवार, मुंबई यांना मिळाला. विधानात विविध इंद्रांची भूमिका भाविकांनी भक्तिभावाने पार पाडली. जलपान, शुद्ध भोजन व महाप्रसादीचे दाते म्हणून विविध जैन परिवारांनी योगदान दिले.

यावेळी प्रवचनातून आचार्य हेमसागरजी महाराज यांनी आत्मशुद्धी, प्रामाणिकपणा आणि प्रभुभक्तीचे महत्त्व सांगितले. “मनुष्य बाहेरून हसत असला तरी अंतर्मनात अनेक वेदना लपवतो. बाह्य आचरण आणि अंतःकरण एकसारखे नसणे ही आध्यात्मिक चोरी आहे,” असे ते म्हणाले. संसारासाठी देह, मन व इंद्रिये द्या; मात्र निर्मळ मन आणि हृदय परमेश्वराच्या चरणी अर्पण करा, असा संदेश त्यांनी दिला.

# टपाल तिकीट संग्रहाला चालना देण्यासाठी ‘दीनदयाळ स्पर्श योजना’; वार्षिक १६ हजार रुपयांची शिष्यवृत्ती

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

विद्यार्थ्यांमध्ये टपाल तिकिटांचा संग्रह व अभ्यास म्हणजेच ‘फिलाटेली’ या ज्ञानवर्धक छंदाची आवड निर्माण व्हावी आणि टपाल तिकिटांमधील अभिरुची व संशोधनाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी भारतीय डाक विभागाच्या वतीने ‘दीनदयाळ स्पर्श योजना २०२६-२७’ राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत लेव्हल-१ फिलाटेली लेखी प्रश्नमंजुषा परीक्षा रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर विभागामार्फत आयोजित करण्यात येणार आहे.

टपाल तिकिटे ही केवळ पत्रव्यवहाराची साधने नसून त्यातून देशाचा इतिहास, भूगोल, संस्कृती, कला, विज्ञान, वारसा, सामाजिक जीवन आणि नामवंत व्यक्तींची माहिती मिळते. विद्यार्थ्यांनी टपाल तिकिटांचा संग्रह करण्याबरोबरच त्यांचा अभ्यास करून ज्ञानवृद्धी करावी, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे.

दीनदयाळ स्पर्श योजना २०२६-२७ मध्ये इयत्ता सहावी, सातवी, आठवी आणि नववीमध्ये शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय डाक विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र विद्यार्थी या निवड प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, निरीक्षणक्षमता आणि सर्जनशीलता रुजवण्यासाठी हा छंद अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांची निवड दोन स्तरांमध्ये केली जाणार आहे. पहिल्या स्तरामध्ये फिलाटेली लेखी प्रश्नमंजुषा घेतली जाईल. आगामी रविवार, २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या लेखी परीक्षेत सद्य घडामोडी, इतिहास, भूगोल, विज्ञान, क्रीडा, कला व संस्कृती, नामवंत व्यक्ती तसेच स्थानिक व राष्ट्रीय फिलाटेली यांसारख्या विषयांवर आधारित प्रश्न विचारले जातील. या पहिल्या स्तरातील परीक्षेतून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या स्तरासाठी पात्र ठरविण्यात येईल. दुसऱ्या स्तरामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना भारतीय डाक विभागाच्या नियमांनुसार ‘फिलाटेली प्रकल्प’ सादर करावा लागेल, ज्यातून विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाला प्रोत्साहन मिळणार आहे.

या संपूर्ण निवड प्रक्रियेत यशस्वी ठरणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना वार्षिक १६ हजार रुपयांची आकर्षक शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासासोबतच अशा प्रकारच्या ज्ञानवर्धक व सर्जनशील छंदांना आर्थिक व नैतिक प्रोत्साहन देणे हा यामागील हेतू आहे.

भारतीय डाक विभागाने सहभागी शाळा, विद्यार्थी व पालकांना या योजनेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. शाळा आणि पालकांनी विद्यार्थ्यांना फिलाटेली या छंदाकडे वळण्यासाठी प्रोत्साहित करावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या नियमित अभ्यासासोबतच देशाचा समृद्ध इतिहास, संस्कृती व वारसा समजून घेण्यास मदत होईल. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी २७ सप्टेंबर रोजी संबंधित सूचनांनुसार आपल्या निर्धारित परीक्षा केंद्रावर वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# श्रावणाच्या चौथ्या सोमवारी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगचे दर्शनासाठी प्रचंड गर्दी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



खुलताबाद प्रतिनिधी दि ७ : वेरूळ श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्य दर्शनासाठी लाखो भाविकांची प्रचंड गर्दी पायी दिंडी व कावड यात्रा. मोठ्या प्रमाणात रविवारी मध्यरात्रीपासून सुरुवात झाली होती भाविकांनी ‘हर हर महादेव’, ‘बम बम भोले’चा जयघोष करत घृष्णेश्वरा १२ वे ज्योतिर्लिंग भगवंताचे दर्शन घेतले.

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरासह. वेरूळ लेणी पाहण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिरापासून जोडरस्त्यापर्यंत बॅरिकेड्स लावून दर्शनासाठी रांगेची व्यवस्था मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती.

गाभाऱ्यातील अभिषेक श्रावण मध्ये महिनाभर बंद करण्यात आलेली आहे. मंदिर परिसरातील मागील गेट हे दर्शन करून भाविकांना व्यवस्थित बाहेर पडण्यासाठी केलेले आहे त्यासाठी या वर्षी प्रथमच महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्सच्या जवानांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रविवारी रात्री दर्शनासाठी मोठ्या संख्येने आलेले भाविक रात्री दहा वाजेपासूनच दर्शन रांगेत लागले होते घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीची जिल्हा परिषद सदस्य कुणाल भाऊ दांडगे यांच्या नियोजनाखाली आलेल्या भाविक भक्तांना मंदिराच्या वतीने सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत होत तसेच भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही, छुपे कॅमेरे, खासगी सुरक्षारक्षक तसेच पोलिस कर्मचारी स्वयंसेवक प्रामाणिकपणे आपले कर्तव्य निभवत

# जिल्हा परिषदेत राजे उमाजी नाईक जयंती उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेत क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त वेरूळ सभागृहात आयोजित कार्यक्रमात राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कनिष्ठ प्रशासन अधिकारी चंद्रशेखर करांडे, रवी कुरा, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहायक देविदास बिरारे, रवी रेड्डी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या लेखाधिकारी जयश्री कवडे, माहिती, शिक्षण, संवाद तज्ज्ञ तथा जनसंपर्क अधिकारी डॉ. संजय वाघ, मनुष्यबळ सल्लागार वसीमोद्दीन नेहरी, राजेंद्र सोनवणे, सल्लागार अलकनंदा पवार, नमिता भोपशेट्टी, प्रतिभा देवतरसे यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तीर्थकुंड ते गंजेश्वर महादेव पायी कावड यात्रा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे .श्री क्षेत्र वेरूळ अहिल्याबाई होळकर तीर्थकुंड या ठिकाणाहून निघणाऱ्या हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत पायी कावड यात्रा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावण महिन्या त मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात हर हर महादेव च्या गजरात पायी कावड यात्रेचे आयोजन दि ७ सप्टेंबर रोजी सोमवारी सकाळी १० वाजेच्या दरम्यान आयोजन करण्यात आले होते कावड यात्रेचा भव्य शुभारंभ हजारो भाविक भक्त च्या उपस्थितीत अभिषेक जल पूजन करून कावड यात्रा प्रमुख चंदाताई राजपूत. व श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम प्रमुख साध्वी आक्काताई महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ फोडून सुरुवात करण्यात आली

यावेळी भव्य सजवलेला रथ भजनी मंडळ टाळमृदुंगाच्या गजरात पावली खेळत हर हर महादेव चा गजर करत कावड यात्रा घृष्णेश्वर मंदिर बारावे ज्योतिर्लिंग . वेरूळ लेणी खुलताबाद भद्रा मारुती मंदिर व लहाने आळी मारुती मंदिर बाजार गल्ली चुलीभांजन या ठिकाणाहून मोठ्या संख्येने पायी चालत आलेले भाविक भक्ता कावड यात्रा गंजेश्वर महादेव मंदिर या जागृत देवस्थानाच्या ठिकाणी भाविकांचे उपस्थितीत महाप्रसादाने समारोप करण्यात आला या जागृत देवस्थानाच्या ठिकाणी हजारो भाविक भक्तां व मान्यवरांच्या उपस्थितीत महाआरती करून महाप्रसादाने समारोप करण्यात खुलताबाद पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता

# उरणमध्ये ‘खान्देश महोत्सव 2026’ उत्साहात संपन्न; मंडळ तर्फे आयोजित विविध उपक्रमांना उत्तम प्रतिसाद.

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड

“नाते मातीशी” या भावनेला केंद्रस्थानी ठेवत खान्देश विकास मंडळ, उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ‘खान्देश महोत्सव २०२६’ हा विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि स्नेहपूर्ण उपक्रमांनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. उरण येथील भारती बँक्वेट हॉल, करंजा रोड येथे झालेल्या या कार्यक्रमाला खानदेशी समाजबांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात सत्यनारायण महापूजा, स्नेहमेळावा, सामूहिक भोजन तसेच विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. खान्देशातून सेवामुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा, खान्देशी डॉक्टरांचा तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.




कार्यक्रमाला उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेशशेठ बालदी, जेएनपीटीच्या जनरल मॅनेजर (एडमिन) मनीषा जाधव, लहास ग्रीन इंडिया प्रा. लि.चे डायरेक्टर गुलाबराव जाधव, माजी खासदार संजीवजी नाईक यांच्या पत्नी कल्पना संजीवजी नाईक, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती ‘ब’चे सभापती मधु दौलतराव पाटील, जिल्हा परिषद सदस्या (उरण) प्रेरणा जितेंद्र घरत, मोरा-उरणचे पोलीस निरीक्षक (क्राईम) राहुल काटवानी, कोपरखैरणे (नवी मुंबई) नगरसेविका मिनाक्षी किशोर पाटील, पंचायत समिती सदस्य (उरण) कैलास मोरेश्वर भोईर, नवजीवन लोक विकास संस्थेचे (कल्याण) अध्यक्ष किशोर तुमडू पाटील, तसेच गाडी लोहार समाज उन्नती मंडळ (कल्याण)चे अध्यक्ष ॲड.युवराज मुरार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विशेष उपस्थिती म्हणून ‘महाराष्ट्र ट्रीपल केसरी’ तथा महाराष्ट्राचे ‘सिंघम’ म्हणून सुपरिचित असलेले पैलवान तथा न्हावा शेवा पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी, महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य (भाजप) तथा उरण नगरपरिषदचे उपनगराध्यक्ष रवीशेठ भोईर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान खान्देशी हास्यकलाकार, नकलाकार व निवेदक-अभिनेते विलासकुमार शिरसाठ यांच्या विशेष खान्देशी मनोरंजन कार्यक्रमाने उपस्थितांची चांगलीच करमणूक केली.

या महोत्सवाच्या आयोजनामध्ये खान्देश विकास मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चित्ते, कार्याध्यक्ष सुनील चौधरी, सचिव सचिन खैरनार, उपाध्यक्ष आनंद कुमावत, खजिनदार वामनराव राठोड, सदस्य भरत पाटील, महिला सदस्य जयश्री महाजन, सभासद डॉ. रविंद्र पाटील, दुर्गेश महाले, रविंद्र सूर्यवंशी, ईश्वर माळी, विजय नगराळे, उपाध्यक्ष कैलास भामरे, सल्लागार संजय पाटील, सदस्य संदीप पाटील, महिला सदस्य राजश्री मोरे, सभासद सुनील झोपे, दिनेश पाटील, भगवान राठोड, गोकुळ धाडी आणि मनोज चव्हाण यांचा सहभाग राहिला.दुपारनंतर उपस्थितांसाठी सामूहिक भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून खान्देशी समाजबांधवांनी आपली संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा जपण्याचा संदेश दिला.खान्देश विकास मंडळ, उरण हे नोंदणीकृत मंडळ असून या मंडळातर्फे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न या महोत्सवातून करण्यात आला.

एकूणच ‘नाते मातीशी’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणणारा हा खानदेश महोत्सव २०२६ सामाजिक एकोपा, संस्कृती आणि स्नेहाचा सुंदर संगम ठरला. मान्यवरांची उपस्थिती, गुणवंत व ज्येष्ठांचा सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामूहिक भोजन आदी विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▮ संपादक : रोहित विकास पाटील ▮ email : hinduprakashvarta@gmail.com ▮ epaper.hinduprakashwarta.com ▮ PRGI No.: MHMAR/25/A2358 ▮ संपर्क क्र. : 7261999911